ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 12 | AUG - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महिला सक्षमीकरणात साहित्याची साहित्याची भूमिका

प्रा.डॉ.भगवान नन्नावरे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर.

**KEY NOTE :** महिला सक्षमीकरणात प्राचीन काळापासून वर्तमानापर्यंत साहित्याची भूमिका महत्त्वाची आणि परिणामकारक ठरलेली आहे.

**ABSTRACT :** कथा, कविता, कादंबरी, नाटक आदि साहित्य प्रकारातून काळानुरूप स्त्री स्वातंत्र्य आणि त्यासंबंधाने उद्भवणारे प्रश्न मांडून स्त्री मुक्तिच्या चळवळीला बळ पुरविले आहे. एकूण महिला सक्षमीकरणात साहित्याची भूमिका महत्त्वाचीच आहे.




## प्रास्ताविक :

साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध आहे. साहित्याची निर्मिती हस्तीदंती मनोऱ्यात किंवा समाज व्यवहारापासून दूर असलेल्या पोकळीत होत नाही. समाजापासून अलिप्त असणारी एखादी कलाकृती निर्माण झालीच तर ती श्रेष्ठ साहित्यात पात्र ठरत नाही. वाङ्मय निर्मितीची मुळ प्रेरणा समाजात आणि मानवी जीवन व्यवस्थेत रुतलेली आहे. लेखकांच्या साहित्यिक पिंड घडविण्यात तत्कालिक सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक परिस्थिती, त्याकाळातील मूल्यव्यवस्था, विचारप्रणाली कारणीभूत ठरत असते. लेखकांच्या सभोवतालची परिस्थिती जशी त्याच्या निर्मितीची स्त्रोत ठरते, तशीच सभोवतालची माणसे आणि त्यांचे जगणे या मानवी जगण्यातील संक्रमणता साहित्य निर्मितीस पोषक ठरत असते.

सामाजिक बांधिलकीतून निर्माण झालेली कलावंताची निर्मिती सर्जनशील अविष्कार असतो. स्वातंत्र्य, समता व विश्व बंधुत्व या तत्वत्रयीतून लेखक सामाजिक मनाचे भरण पोषण करत असतात. साहित्य ही समाजजीवनावर संस्कार करणारी एक व्यवस्था आहे. साहित्यनिर्मितीच्या आरंभ काळापासून साहित्यातून स्त्री आणि तिचे भावविश्व प्रत्ययकारीतेने साकार झाले आहे. समाजातील स्त्रियांच्या प्रश्नोप्रश्नांना अधोरेखित करणारा स्त्रीमुक्तीचा विचार साहित्यनिर्मितीच्या केंद्रस्थानी असलेला दिसून येतो. स्त्रियांना जगण्याचे नेमके भान निर्माण करून देण्यात, पुरुषसत्ताक संस्कृतीतील स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यात, तिला वैचारिक मुक्ती देण्यात एकूणच महिला सक्षमीकरणात साहित्याची भूमिका महत्त्वाची ठरलेली आहे.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या निमित्ताने महिला सक्षमीकरणात साहित्याच्या असणाऱ्या भूमिकेविषयी साधक–बाधक चर्चा करता येईल.

लेखक हा सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य घटक असतो. सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीचा तो साक्षीदार असतो. या समकालीन जगण्यातील घटना प्रसंगांना लेखकाने दिलेली शाब्दिक प्रतिक्रिया म्हणजे त्याची निर्मिती असते. एकोणिसाव्या शतकात निर्माण झालेले मराठी साहित्य सामाजिक

समस्यांना अधोरेखित करणारे साहित्य होते. या समस्यांचा ऊहापोह करून सामाजिक प्रबोधन करण्याचे महत्तम कार्य साहित्याने अंगिकारलेले दिसते. या संदर्भाने डॉ.अंजली सोमण यांनी नोंदविले मत अत्यंत महत्त्वपूर्ण वाटते. त्या लिहितात,''लेखक हा समाजाचाच एक घटक असल्याने आणि अवतीभोवतीचा समाज हा त्यांच्या चिंतनाचा आणि पोषणाचा विषय असल्याने त्याच्या लेखनात सामाजिक घटना प्रसंगाचे चित्रण येत असतेच. पण, अनेक सामाजिक समस्यांचे आणि सामाजिक परिस्थितीचे संसुचनही त्याच्या लेखनातून होत असते. कधीकधी सामाजिक समस्यांचे सामाजिक विचारांचे एक वाहन म्हणून ही साहित्यकृतीकडे पाहिले जाते. नव्हे त्याच हेतूने साहित्यकृती जन्माला घातल्या जातात.''[१] डॉ.सोमण यांनी लेखक,समाज आणि त्याची निर्मिती हा विचार स्पष्ट करून, लेखक सामाजिक समस्या आणि सामाजिक विचारांची पेरणी आपल्या निर्मितीतून कसा करतो ते सुचविले आहे.

साहित्याच्या प्रारंभ अवस्थेतील कथा, कादंबरी, कविता आदी साहित्य प्रकारातून समाजातील स्त्रिया आणि त्यांच्या जगण्याला ग्रासणाऱ्या समस्या व त्यांचे परिणाम अत्यंत प्रभावीपणे मांडले आहेत. 'यमुना पर्यटन' ही बाबा पद्मनजी यांची कादंबरी. त्या काळातील स्त्रियांच्या वास्तव परिस्थितीचे नेमके सूतोवाच करणारी आहे. सामाजिक तसेच स्त्री सुधारणाविषयक लोकमत जागृत करण्याचे प्रयत्न त्या काळातील साहित्यिकांनी केले आहते. हरिभाऊ आपटे 'पण लक्षात कोण घेतो', बा.स.गडकरी 'विद्वान सोबती की कुशल गृहिणी', सहकारी कृष्ण 'ही प्रेमाची मूस की पुरुषार्थाची कूस?' या कादंबरीकारांनी आपल्या कादंबऱ्यांतून स्त्री सुधारणाविषयी, स्त्री शिक्षणाविषयी तसेच संसारातील स्त्रियांच्या भूमिकांविषयी विचारमंथन करून स्त्री सक्षमीकरणासाठी पुढाकार घेतला आहे.

लोकहितवादी या काळात लेखन करणारे एक जाणकार आणि दृष्टे लेखक होते. त्यांच्या शतपत्रातून स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, अजाणतेपणी होणारे विवाह याविषयावर अनुकूल मते मांडण्यास प्रारंभ केला होता. त्यांच्या समकालीन असणाऱ्या न्यायमूर्ती रानडे आणि विष्णुशास्त्री पंडित यांनी पुनर्विवाहास अनुकूल लेखन करून विधवा विवाहास प्रोत्साहन दिले. या विचारांनी त्या काळातील स्त्रियांना एक प्रकारे जीवन संजीवनी मिळवून दिली. प्रस्तुत काळातील एक महत्त्वाचे नाटककार असणारे गो.ब.देवल यांनी 'शारदा' या नाटकातून बाल जरठ विवाहाचा विषय प्रतिपादला आहे. बाल जरठ विवाहाच्या दुष्परिणामाला साकार करून देवलांनी पारंपरिक रूढीच्या चौकटीत स्त्रियांची होणारी कुचंबणा अधोरेखित केली आहे.

मराठी साहित्याच्या प्रारंभापासून स्त्री ही साहित्याचा विषय झालेली आहे. स्त्रीच्या जगण्याचे नानाविध पैलू साहित्यात काळानुरूप पडले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात समाजाच्या सर्व स्तरात आमूलाग्र बदल झाला. स्त्रियांच्या जगण्याला नवे आयाम निर्माण झाले. सहकार क्षेत्र, राजकीय क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र आदी वेगवेगळ्या प्रांतात स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाची मुद्रा उमटविली आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाने स्त्रियांच्या सबलीकरणात मोलाची भर घातली. समाजातील ठराविक वर्गातील स्त्रिया या प्रवाहात आल्या होत्या. ही सार्वत्रिकता तळागाळापर्यंत पोहोचविण्यात समकालीन साहित्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. या काळात निर्माण झालेल्या साहित्याने स्त्रीच्या विविधात्मकतेला साकारून तिच्या सक्षमीकरणात बजावलेली भूमिका स्त्रीच्या अंतरंगाला व बहीर्गाला साकारणारी कशी होती, ते द.ता.भोसले यांनी नोंदविलेल्या मतावरून अधिक स्पष्ट होईल ते म्हणतात,''सामाजिक स्थित्यंतरामुळे मानवी जीवनावर जसा परिणाम झाला तसा तो जीवन दृष्टीवर झाला. याची ठळक खूण म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेले स्त्रीजीवनाचे चित्रण हे होय. शिक्षण आणि आत्मविश्वास आलेली स्त्री, घराच्या बाहेर पडून नानाविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या केवळ गृहिणीच्या भूमिकेत स्वत:ला जखडून न घेणारी, पुरुषी व्यवस्थेने घातलेल्या बंधना विरुद्ध बंड करणारी, समता नि व्यक्ती स्वातंत्र्याची मागणी आग्रहाने करणारी, स्त्री—पुरुष संबंधाकडे मनमोकळेपणाने नि परस्परपोषकतेच्या भावनेने पाहून वागणारी, पारंपरिक रीती—रिवाज रूढीतील निरर्थकता चालवल्याने त्यांचा त्याग करणारी, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कर्तृत्व गाजवणारी, कामभावनेकडे समंजस भूमिकेतून पाहणारी, स्त्री म्हणून समान हक्क, समान संधी, समान न्याय आणि समान दृष्टिकोन यांची मागणी करणारी, विवाह बंधनाचा काच होत असेल तर त्यातून मुक्त होण्याचे धाडस करणारी, सेकंड सेक्सच्या नावाखाली दुय्यम वागणुकीचा आक्षेप करणारी, एका वेगळ्या व्यक्तिमत्त्वाची आणि कर्तृत्वाची स्त्री या पन्नास साठ वर्षातील मराठी कादंबरी मध्ये आपणास भेटते.''[२] डॉ.

भोसले यांनी एकूणच सामाजिक जीवनात स्त्रीच्या भूमिकेत झालेल्या बदलाला ग्रामीण कादंबरीने अधोरेखित करून समाजातील स्त्रियांना नवी दिशा. नवा विचार दिलेला दिसून येतो. म्हणूनच महिला सक्षमीकरणात साहित्याची भूमिका महत्त्वाची ठरते. हे वेगळे सांगण्याची गरज नसावी.

१९८० नंतरच्या काळात समाजाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रियांचा वावर मोठ्या स्वरूपात असलेला दिसून येतो. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असणारी स्त्री ही अभ्यासकांच्या चिंतनाचा विषय न ठरावी तरच नवल. म्हणूनच या कालखंडात जी साहित्यनिर्मिती झाली आहे, ती स्त्री जीवनाच्या या बदलाचे प्रत्ययकारी चित्रण दर्शविणारी अशीच आहे. शिक्षणाने स्वावलंबी झालेली स्त्री परंपरागत जीवनाची बंधने झुगारून आपले अस्तित्व सिद्ध करण्यास तयार झाल्याचे या कालखंडात दिसून येते. स्त्री ही केवळ साहित्याचा विषय न राहता, ती जगण्याचा विषय बनलेली दिसून येते. त्यामुळेच मराठी साहित्यात येणारे स्त्री चित्रण हे ग्रामीण, नागर, सुशिक्षित, पांढरपेशा अशा वेगवेगळ्या स्तरातील असलेली दिसून येतात. या स्त्री चित्रणाच्या दृष्टिकोनामुळे मराठी साहित्याने स्त्रीविषयक विचारांची पेरणी केलेली दिसून येते. ग्रामीण जीवनातील स्त्री ही साहित्यातून नेमकेपणाने अधोरेखित होऊ लागलेली आहे. ग्रामीण स्त्रीच्या वेगवेगळ्या पैलूंवर आजच्या ग्रामीण साहित्यातून नेमकेपणाने कसा प्रकाश पडतो. याविषयी भाष्य करताना रा.रं.बोराडे म्हणतात,''ग्रामीण स्त्री देखील आता बदलू लागली आहे. ग्रामीण स्त्रिला तिच्या हक्काची जाणीव करून देण्याच, तिच्यामध्ये जागृती घडवून आणण्याचे महत्वाचे कार्य सध्या विविध सामाजिक संघटना करीत आहेत. शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि शेतकरी शेतमजूर स्त्रियांच्या सर्व कसोट्यांविरुद्ध शेतकरी संघटना आज लढत आहे. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून खेड्यापाड्यातील स्त्री आता जागी होऊ लागली आहे. ती आता बोलू चालू लागली आहे. दलित स्त्री ही दलितांची दलित आहे ही जाणीव खेड्यातल्या दलित स्त्रीला जशी होऊ लागली आहे, त्याच प्रमाणे गुलाम असलेल्या आपल्या नवऱ्याचे आपण गुलाम आहोत, ही जाणीव खेड्यातल्या शेतकरी—शेतमजूर स्त्रीला होऊ लागली आहे.''[३] ग्रामीण स्त्रीमध्ये आलेल्या या आत्मभानाचे वास्तव चित्रण तत्कालीन अनेक ग्रामीण कादंबऱ्यांतून प्रभावीपणे झालेले आहे. तसेच कथा, कविता या साहित्यप्रकारातूनही बदलत्या स्त्रियांचे वास्तव चित्र अधोरेखित झाले आहे.

आधुनिक विचाराचे वारे पिलेली स्त्री ही सर्वांगाने परिपूर्ण होऊ लागलेली होती. म्हणूनच स्त्रीच्या या सक्षमीकरणात साहित्याची असलेली भूमिका ही अनन्यसाधारण ठरते. स्त्रियांच्या नव्या उर्मी आणि नवी क्षितिजे साहित्याचा विषय होऊन पुढे आली. अशा आपल्या सभोवतालच्या बदलत्या स्त्रीच्या चित्रणाचे चिंतन अभ्यासून समाजात स्त्रियांनीही आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच राजकारण, वैद्यकीय क्षेत्र, सिनेसृष्टी, सैनिक दल, शेती व्यवसाय, विमान पायलट, क्रीडा क्षेत्र या सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी मोठा नावलौकिक मिळवलेला दिसून येतो. वर्तमानाचा विचार करता खऱ्या अर्थाने ताराबाई शिंदे यांच्या स्त्री—पुरुष या ग्रंथातून साकार झालेल्या स्त्री—पुरुष समानतेच्या विचाराचे प्रत्यंतर वर्तमान काळात येत आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## समारोप :

अशाप्रकारे सारांश रुपाने असे सांगता येते की, मराठी साहित्यात स्त्री जीवनाचे चित्रण करण्याची प्राचीन परंपरा असलेली दिसून येते. मराठी साहित्याने त्या—त्या काळात स्त्रियांच्या उद्धारासाठी केलेले प्रयत्न हेच खऱ्या अर्थाने आजच्या सक्षम स्त्रीच्या जीवन विश्वाचे गमक आहे, असे म्हणणे खरे ठरणारे आहे. मराठी साहित्याने त्या त्या काळात स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली, म्हणूनच वर्तमानात पुरुषसत्ताक संस्कृती मागे पडून स्त्रीसत्ताक संस्कृतीचा नवा विचार पुढे येऊ लागलेला आहे. या व्यवस्थेत कोठेच विचारात घेतली न जाणारी स्त्री आज प्रत्येक क्षेत्राचा विचार झालेली आहे.

## संदर्भ :

१. डॉ.अंजली सोमण, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, सुधारीत द्वितीय आवृत्ती, २००५, पृ.३७.
२. डॉ.द.ता.भोसले, साहित्य : आस्वाद आणि अनुभव, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ.२०१२, पृ.२५.
३. रा.रं.बोराडे, ग्रामीण साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९२, पृ.४२.